माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या

Format of application for

Right of Inf

अ

Appli







स्वा. प्र
१२४९
२१/८/१८
नगर सचिव

प्रति,
To,

नगरसचिव . मिरा . भाईंदर महानगरपालिका .

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र. ५४/२०१८-१९
दिनांक :- २३/०८/२०१८

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :
Full Name of the applicant

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :
Address

भोगम प्रदिप दिलीप
बी . १० . गणेश भवन . भाईंदर पूर्व

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :
Particulars information required

१) श्री . संभाजी पानपट्टे यांच्याबाबत कायमस्वरूपी करणेबाबत करण्यात आलेला ठराव सत्यप्रत करून देण्यात यावा .

२) श्री . संभाजी पानपट्टे यांच्याबाबत सेवेतून बडतर्फ व शासनाकडे पुन्हा पाठवणेबाबत सेवा-निष्कासित करणेबाबत केलेला ठराव सत्यप्रत करून द्यावा .

माहिती ज्याच्याशी संबंधीत असले तो कालावधी # : २००२ ते २० ऑगस्ट २०१८ पर्यंत .
The period to which the information relates

माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वतः घेऊन जाणार आहात किंवा कसे
Whether information is required by post or in person
(जादा शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल ) : प्रत्यक्ष .

( The actual postal charges shall be included in additional fees )

जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे : प्रत्यक्ष .
In case by post
( साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने )
(Ordinary, Registered or Speed )

४) अर्जदार दारिद्रयरेषेखाली आहे किंवा कसे : होय/नाही नाहि .
Whether the applicant is below poverty line : ( Yes/No)
( असल्यास त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी )

दिनांक
Date २०/८/१८ .

ठिकाण
Place भाईंदर .

(signature)
अर्जदाराची सही
Signature of the Applicant

*विषय ठळक स्वरूपात दर्शविण्यात यावा (जसे शासकीय जमीन देणे/सेवाविषयक बाब लायसेन्स इत्यादी )
Broad Category of the subject be indicated (such ) as grant of Govt. Land/Service matter/Licenses etc. )
# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबंध कालावधी दर्शविण्यात यावा.
Relevant period for which information I required to be indicated
$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.
Specific details of the information is required to be indicated

TM

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./५२/2018 दिनांक :-२८/०८/2018

**प्रति,**
**श्री. प्रदिप दिलीप जंगम**
**जी 10, गणेश भवन,**
**नर्मदा नगर, भाईंदर (पूर्व)**

**विषय :-** <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>
**श्री. संभाजी पानपट्टे यांना सेवेत कायमस्वरुपी करणेबाबत व सेवेतून बडतर्फ करणेबाबत झालेल्या मंजुर ठरावांची प्रत मिळणेबाबत..**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 20/08/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण, श्री. संभाजी पानपट्टे, यांना सेवेत कायमस्वरुपी करणेबाबत व सेवेतून बडतर्फ करणेबाबत झालेल्या मंजुर ठरावांच्या सत्यप्रतीची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस मा. सर्वसाधरण सभा दि. 05/06/2004 ठराव क्र. 15 व मा. महासभा दि. 19/11/2008, ठराव क्र. 65 या ठरावांच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देत आहोत. (एकूण पाने 02)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2D:\Mahiti Adhikar\Letter - Pradeep Jangam.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. सर्वसाधारण सभा दि. ०५/०६/२००४

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

प्रकरण कमांक :- 93

विषयः- डॉ एस्. एस्. पानपट्टे उपआयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका, यांना लोकसेवा हितार्थ कायम स्वरुपी उपआयुक्त पदी महानगरपालिकेत समाविष्ट करुन घेणे बाबत.

ठराव कं :- 95

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एकूण तीन उपआयुक्त पदे मंजूर आहेत. सद्या तीनही पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने उपआयुक्त काम करीत आहेत. प्रतिनियुक्तीने आलेले उपआयुक्त सतत बदलत असतात तेव्हां एखादा कायमस्वरुपी उपआयुक्त असल्यास त्यास प्रशासनाच्या कामाची माहिती असते व त्यामुळे प्रशासन सुरळीत चालण्यास मदत होत असते.

डॉ. एस्. एस्. पानपट्टे यांनी यापूर्वी उल्हासनगर महानगरपालिकेत उपआयुक्त या पदावर अडीच वर्षे काम केलेले आहे व त्यांनी अतिक्रमण विभाग व आरोग्य विभागाची जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडलेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेत सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे सन २००३-२००४ चे उद्दीष्टाच्या २०० ते ३०० % ने अधिक उद्दिष्ट साध्य केले आहे व १७ वी पंचवार्षिक पशुगणणा २००३ हे काम मिरा भाईंदर महानगरपालिकेने सर्वात प्रथम केले आहे. त्याबद्दल मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे हयांचे अभिनंदन पत्र दिलेले आहे.

डॉ. एस्. एस्. पानपट्टे हे स्वतः पशूवैद्यक असल्यामुळे पशूसंवर्धन विषयक सर्व कामे उदा. कत्तलखाना उभारणे, मांस विकी परवाना देणे, मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रीत करणे इत्यादी कामे हाती घेतलेली आहेत. डॉ. एस्. एस्. पानपट्टे यांनी उपआयुक्त पदावर महानगरपालिकेत कायम स्वरुपी समाविष्ट करुन घेण्याबद्दल संमती पत्र दिले आहे.

त्याकरीता डॉ. एस्. एस्. पानपट्टे यांना उपआयुक्तपदी लोक सेवा हितार्थ मिरा भाईंदर महानगरपालिकेत कायम स्वरुपी समाविष्ट करुन घेण्यास ही मा. सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

सुचक - श्री. चंद्रकांत वैती

अनुमोदन - श्री. हेमन गोविंद

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या माहितीच्या छायाप्रतीची साक्षांकित प्रत
जन माहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. महासभा

## दि. १९/११/२००८

153

मिरा – भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प.).

**विषय : आरोग्य विभागाचे उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., यांना निलंबीत करण्याबाबत.**

**ठराव :** ६५

महानगरपालिका क्षेत्रात आरोग्य विषयक तक्रारी दिवसेंदिवस वाढत आहेत. कचरा डंपीगचा प्रश्न सातत्याने निर्माण होत आहे. साफसफाई, नालेसफाई बाबत तक्रार तसेच सध्या डासांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.

आरोग्य विभागातर्फे औषध फवारणी, गटार सफाई नियमीतपणे होत नसल्यामुळे डासांचे प्रमाणे वाढलेले असून ह्याबाबत महासभेत नेहमीच चर्चा होत असते. अनेक नगरसेवकांनी आरोग्य विभागाच्या कामकाजाबाबत तक्रारी केलेल्या आहेत. त्यावर आरोग्य विभागामार्फत समाधानकारक कारवाई होत नसल्याचे दिसून आले आहे.

आरोग्य विभागाचे प्रमुख उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., हे आरोग्य विभागाच्या अकार्यक्षम कामाकाजास जबाबदार आहेत. महासभेमध्ये आरोग्य विषयक प्रश्नांवर रूलींग देताना मा. महापौर सो., ह्यांनी औषध खरेदी विषयावर सविस्तर चौकशी करून मा. आयुक्त सो., ह्यांना पुढील महासभेत अहवाल सादर करावा असे निर्देश दिलेले होते. तथापी, मा. आयुक्त सो., ह्यांनी देखील त्यावर आपला अहवाल दिलेला नाही. तसेच मुख्य लेखा परिक्षकांचा अहवाल (भोजा) विरोधात आहे.

कुत्र्यांचे निर्बिजीकरण करण्यास औषध खरेदी बाबत आरोग्य विभागाचे उपायुक्त, श्री. पानपट्टे सो., हे जबाबदार असून आरोग्याच्या चांगल्या परिणामकारक कामकाजास ते अकार्यक्षम ठरलेले आहेत. सबब त्यांना मुंबई प्रांतीक महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार निलंबीत करण्यात यावे ह्यास ही महासभा मंजुरी देत आहे.

सुचक – [signature]

अनुमोदक – [signature]

ठराव सर्वांनुमते मंजुर

[signature]
19/11/08

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या छायाप्रतीची साक्षांकित प्रत
[signature] 20/5/09
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका